Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - IV Issue-III MARCH 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# भारतातील बाल हक्कांची : स्थिती आणि आव्हाने

डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**प्रस्तावना :**

२०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकुण लोकसंख्येपैकी ०-१४ वयोगटातील ३१.२% बालक आहे. कोणत्याही देशाच्या समाजाचे भविष्य देशातील बालकांचे संरक्षण आणि विकासावर अवलंबून असते. बालके देशाचे भविष्य असतात त्यांच्याच खांद्यावर देशाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवस्थेचे उत्तरदायित्व असते. सध्या भारताच्या विकासाचा संपूर्ण जगात बोलबाला आहे. परंतु विकासाच्या या प्रक्रियेत बालकांचे हक्क व संरक्षणाकडे दुर्लक्ष होत नाही का ? याकडे लक्ष द्यावे लागेल. वाढत्या बालमजुरीऐवजी बालकांचे लक्ष शिक्षणाकडे कसे वळेल ? वाढत्या विकासाचा फायदा घेवून शिक्षणातून बालकांना मजुरीच्या जोखडातून मुक्त करता येईल का ? प्रस्तुत शोधनिबंधातून भारतातील बाल अधिकारांची स्थिती व त्यासमोरील आव्हाने व उपायांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणत्याही मनुष्याला मनुष्य बनवण्यात शिक्षणाचे महत्वपूर्ण योगदान आहे. एक सुशिक्षित व्यक्ति स्वतः व समाज हिताचा विचार करु शकतो. राज्य संस्थेसाठी लोकसंख्या हे अनिवार्य तत्व आहे. या लोकसंख्येत बालके हा एक महत्वाचा घटक आहे. त्यामुळे शासन व समाजाची जबाबदारी आहे की यांच्या विकासासाठी, संरक्षणासाठी आवश्यक व ठोस निर्णय घ्यावे लागतील. कोणत्याही देश आणि समाज व व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. परंतु वास्तवतेत समाजातील सर्वच घटकांना शिक्षणाची समान संधी मिळत नाही. तिच स्थिती बालकांबाबतही आहे. योग्य संधीचा अभाव आणि विविध सामाजिक - आर्थिक अडचणींमुळे आजही अनेक बालक आपल्या अधिकारापासून वंचित आहेत. उदा : शिक्षण, आरोग्य, पालन-पोषण, बालमजुरी, बालयौन शोषण, बालहिंसा, बालगुन्हेगारी ई.

बालकांच्या हक्कांविषयी संयुक्त राष्ट्र संघटनेने आपल्या जाहिरनाम्यात बालकांच्या नागरिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांना स्पष्ट केले. या बाल अधिकारात १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मनुष्याच्या मुलभुत अधिकारांना समाविष्ट केले. भारताने ११ सप्टेंबर १९९२ ला या कराराचे समर्थन केले. भारत शासनाने बालक विकास मंत्रालयाला केंद्रीय संस्था म्हणून त्याबाबत समन्वय राखण्याची जबाबदारी सोपवली. शैक्षणिक संधी मिळूनही आणि नागरी अधिकारासंबंधी संविधानात्मक आश्वासन व्यापक स्तरावर तरतूद असूनही अधिक बालक आपल्या अधिकारापासून वंचित आहेत. त्यांच्यासोबत भेदभाव केला जातो. त्यांच्या मुलभुत अधिकारांचे उल्लंघन केले जाते.

**भारतीय राज्यघटना आणि बाल हक्क :-**

भारतीय राज्यघटनेत नमुद मुलभुत अधिकार मार्गदर्शक तत्व आणि इतर कलमात बाल हक्कांना स्पष्ट केले. ज्यात खालील कलमांचा उल्लेख करत येईल. कलम १४ :- नुसार राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोर समान आणि भारताच्या भौगोलिक क्षेत्राअंतर्गत कायद्याचे समान संरक्षण देण्यापासून वंचित ठेवणार नाही. कलम १५ :- नुसार राज्य कोणासोबतही भेदभाव करणार नाही. कलम १६ :- नुसार कोणत्याही व्यक्तिला जीवन आणि व्यक्ति स्वातंत्र्याच्या हक्कापासून वंचित ठेवले जाणार नाही. जोपर्यंत कायद्याद्वारा स्थापीत प्रक्रियेनुसार तसे करणे अपेक्षित नसेल. कलम २१ (क) :- राज्याच्या कायद्यामार्फत निर्धारित केल्याप्रमाणे ६-१४ वर्षातील बालकांना निःशुल्क व अनिवार्य शिक्षण दिले जावे. कलम २३ :- मानवाचा अनैतिक व्यापार, वेठबिगारी आणि अन्य प्रकारचे श्रम निषेध आहे. कायद्यानुसार तो अपराध आहे.

कलम २४ :- नुसार १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकास कारखाने, खानी आणि अन्य इतर जोखिमयुक्त व्यवसायात कामावर ठेवता येणार नाही. कलम ४५ :- नुसार राज्य सहा वर्षांपर्यंतच्या सर्व बालकांची बाल्यावस्थेतील व्यवस्था व शिक्षण देईल. कलम ४४३ (घ) अनुसूची - II :- शिक्षण, कुटुंब कल्याण, आरोग्य स्वच्छता आणि बाल कल्याणास प्रभावित करणाऱ्या

मुद्यांशिवाय महिला व बालक विकास कार्यक्रमांना पंचायतींना सोपवेल. कलम ३५ (५) :- नुसार बालकाच्या बाल्यावस्थेचा दुरुपयोग होणार नाही आणि आर्थिक आवश्यकतामुळे ते रोजगार करणार नाहीत अशी धोरणे घ्यावीत. कलम ३९ (च) :- राज्याद्वारा हे निश्चित करावे की बालकांना स्वतंत्र व सन्मानजनक वातावरणात आरोग्य व विकासाच्या संधी व सुविधा उपलब्ध होतील त्यांचे शोषण होणार नाही.

**बाल हक्काबाबतचे दृष्टिकोन :-**

समाजातील कोणत्याही व्यक्तिच्या अधिकारांचे उल्लंघन होण्याचे सर्वप्रथम कारण म्हणजे त्याप्रतीचा समाजाचा दृष्टीकोण. हाच निकष बालकांच्या हक्कांचे उल्लंघन होण्याबाबतही लागू पडतो. भारतातील सर्वच कुटुंबातील मुलांना त्यांच्या आवडी व प्रवृत्तीनुरुप विकसित होण्याची संधी दिली जात नाही. आम्ही त्यांच्यावर आपल्या इच्छा व स्वप्न लादत असतो.

बालमानसिकता पालक, समाज, गुरु यांच्या इच्छा व स्वार्थात तुडवल्या जातात. या स्थितीस बाल अधिकारांकडे वयस्कांच्या दृष्टीकोन कारणीभुत आहे. वयस्क बालकांच्या जीवनाबाबत सर्वच निर्णय घेतात. त्यांच्या अधिकाराऐवजी संरक्षणाबाबत अधिक काळजी केली जाते. बालकांच्या अधिकारांचे उल्लंघन फक्त गरीब, दलित समूहातील बालकांपर्यंतच मर्यादीत नाही तर ते मध्यम आणि उच्च दर्जाच्या बालकांचेही होते.

**योजना आणि बाल हक्क व विकास :-**

कोणतेही धोरण व योजनांचा शुभारंभ बालकांच्या अधिकाराप्रती सन्मान राखुनच करावा. तरच विषमता नष्ट करणाऱ्या आणि विकासाशी संबंधित असणाऱ्या योजना यशस्वी होतात. कोणत्याही नियोजनाचा केंद्रबिंदू बालकांना मानुन नियोजन होत आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेत बालकल्याणासह बालविकास आणि अधिकारांवर अधिक भर देण्यात आला. तर नवव्या योजनेत बालविकासाचा संबंध राष्ट्राच्या भविष्याशी जोडण्यात आला. दहाव्या योजनेत अनेक धोरणे बाल विकासाच्या दिशेने घेण्यात आले. विद्यालयात मुलांची संख्या वाढावी, प्रत्येक मुलांना योग्य व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार मिळावा म्हणून सर्व शिक्षा अभियान राबवले. सर्वसमावेशक बाल विकास योजना प्रारंभ केला. किशोरी कन्या कार्यक्रम राबवण्यास प्रारंभ केला. अकराव्या पंचवार्षिक योजनेत सर्वच वयातील, समुदायातील आणि आर्थिक घटकातील मुलांचे जीवन, सुरक्षा व बहुमुखी विकासासाठी कटिबध्द आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत अंगणवाडीचे सशक्तीकरण करुन त्यास शिक्षण देणाऱ्या केंद्रात विकसित करणे, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन, सर्व शिक्षा अभियान, मनरेगा, यांसारख्या योजनांमधुन नागरि समाज, N.G.O., यांच्या सहभागित्वास वाढवण्याचे प्रयत्न झाले.

२०१४ च्या नरेंद्र मोदी शासनाने बालविकास आणि बालअधिकारांच्या हितासाठी महत्वपूर्ण धोरण आखले. या शासनाने शाळेत मुलींसाठी शौचालय बांधणे, बेटी-बचाओ बेटी-पढाओ, सुकन्या समृध्दी योजना, बाल स्वच्छता अभियान, हरवलेल्या मुलांसाठी खोया-पाया वेबसाईट, टीकाकरणासाठी मिशन-इंद्रधनुष्य यांसारख्या योजना प्रारंभ केल्या. एवढे करुनही आणखी ३५% मुलांचे लस टिकाकरण होत नाही. तसेच फक्त २६.५% मुलांनाच पुरक व पोषक आहार मिळतो. ज्यातही १२% मुलेच ते सातत्याने घेतात. बालकांसाठी स्वच्छता ही महत्वाची आहे. शासनाने पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंच्या १२५ व्या जयंतीदिनी बाल स्वच्छता मिशनचा प्रारंभ केला. ज्याचा उद्देश स्वच्छ भोजन,स्वच्छता, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छ शौचालयास प्रोत्साहन देवून शाळेत स्वच्छता राखणे. महात्मा गांधीच्या जयंतीदिनी नरेंद्र मोदींनी सुरु केलेल्या स्वच्छ भारत अभियानाचा तो एक भाग आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार दरवर्षी जवळपास ७० हजार मुले हरवतात. या मुलांना शोधण्यासाठी शासन तंत्रज्ञानाचा आधार घेत आहे. यासाठी खोया-पाया वेबसाइट चालु केली. या वेबसाइटवर कोणीही नागरिक हरवलेल्या व्यक्तींची किंवा बालकांची माहिती टाकू शकते. हरवलेल्या मुलांसाठी शासन बालकांची माहीती टाकू शकते. हरवलेल्या मुलांसाठी शासन ट्रॅक चाइल्ड नावाची वेबसाइट चालवते. ज्यात फक्त पोलीसांसोबतच संवाद होवू शकतो. यात फक्त हरवलेल्या मुलांची माहिती असते. ज्याची पोलिसांत माहिती दिली जाते. ट्रॅक चाईल्ड हे एक मर्यादीत वेबसाइट आहे. रेल्वे, बस, धाबे, खाणीसारख्या उद्योगात काम करणाऱ्या मुलांना तेथुन मुक्त करुन बालसुधार उद्योगात काम करणाऱ्या मुलांना तेथून मुक्त करुन बालसुधार व किशोरसुधार गृहात ठेवण्याची व्यवस्था सुनिश्चित झाल्यावर ही समस्या सुटेल. त्यासाठी किशोर सुधारगृहाची स्थापना करावी लागेल.

**बालके आणि शिक्षणाचा हक्क :-**

जगात जवळपास ७५% मुले शालेय शिक्षणापासुन वंचित आहेत. या सर्वांना सुशिक्षित बनवणे किंवा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी धोरण निर्मात्यांनी अनेक प्रयत्न केले. मुलांना एक आरोग्यक्षम आणि उत्पादन करणारे नागरिक बनवण्यासाठी प्रारंभापासूनच देखरेख, सुरक्षा व पालन-पोषणाची गरज आहे. अनेक अभ्यास व संशोधन स्पष्ट करतात की, सहा वर्षांपर्यंतच्या बालकांची देखभाल, सुरक्षा आणि पालन-पोषणावर देण्यात येणारे लक्षच त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्व विकास आणि क्षमतावर प्रभाव टाकतात. भारतासारख्या विकसनशील देशात आणखीनही या वर्गाबाबत निश्चित धोरण आखले नाही.

२००९ साली संपूर्ण देशात शिक्षणाचा अधिकार लागू झाला. भारतातील शिक्षणाच्या अधिकारांसाठी झालेल्या संघर्ष यात्रेवर नजर टाकता प्राचीन इतिहासात गौतम बुध्द, गुरुकुल परंपरा, मध्ययुगात महात्मा बसवेश्वर, मठ परंपरा, वैदिक परंपरा, आधुनिक युगात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, ईस्ट इंडिया कंपनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्यानंतरच्या शासनाने प्रयत्न केले. फुल्यांनी हट्ट आयोगासमोर अहवाल मांडला. २००२ साली झालेल्या ८६ व्या घटनादुरुस्तीनुसार ६ ते १४ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी प्राथमिक शिक्षण मुलभुत अधिकार बनवला या कायद्याने प्रथमतःच लिहीणे-वाचण्यास मुलांच्या अधिकारात रेखांकित केले. याद्वारे सर्व मुलांना सुशिक्षित करणे आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागास वर्गास वेगळे होण्यापासून रोखले. या अधिकारांमुळे जे परिणाम झाले ते फारच आनंददायक आहे. युनोच्या युनेस्कोने हा कायदा आणि सर्व शिक्षा अभियानाच्या परिणामांची स्तुती केली.

**बाल आरोग्य आणि पोषण :-**

भारत आज विकसित होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. यासाठी कुपोषणाचे प्रमाण कमी करावे लागेल. शाळेपूर्वीच्या शिक्षणावर अधिक भर द्यावा लागेल. बालकात रोगप्रतिकारक शक्ती विकसित करावी लागेल. देश एक शिक्षित बनण्यासोबत स्वस्थ बनणेही गरजेचे आहे. भारतात बाल आणि मातृ मृत्युदर दोन्हीही चिंताजनक आहेत. भारतात सहा महिने ते ३५ महिन्यांपर्यंतचे ७५% मुले रक्तहीनतेचे शिकार आहेत. गरोदर महिलांच्या जेवणात आयोडीनचे प्रमाण कमी असल्यामुळे गर्भस्थ शिशुवर वाईट परिणाम पडतो. जन्मानंतर अशा बालकांची वाढ कमी होते. भारतात जवळपास १० करोड मुले कुपोषणाचे शिकार आहेत. मुलांचे आरोग्य आईच्या आरोग्य आणि खाण्या-पिण्याशी संबंधित आहे. पाच वर्षांच्या अवस्थेपर्यंत मुलांच्या शारिरीक, मानसिक, बौध्दिक व संवेगनात्मक विकास फार तीव्र गतिने होतो. या वयात जर मुलांना पौष्टिक आहार मिळाला नाही तर त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. गरीबी, अज्ञान, जागरुकतेचा अभाव, जेवण्याच्या पध्दती, अस्वच्छता, संतुलित भोजनाचा अभाव, आरोग्य सुविधांचा अभाव, रुढी-परंपरा या सर्वांना कुपोषण व अल्पोषणाचे कारण मानता येते. भारतात मुलींचे आरोग्य व पोषण सुनिश्चित करण्याचे अनेक कार्यक्रम चालवण्यात आले. ज्यात अंगणवाड्यांची निर्मिती, मध्यान्ह भोजन, टिकाकरण कार्यक्रम, ई. भारतात १३.६७ लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्र आणि १२.६६ लाख मिनी अंगणवाडी केंद्र आहेत.

**बाज मजुरी आणि शोषण :-**

बाल मजूरी आणि त्यांचे शोषण बाल हक्क व विकासांसमोरील मोठी समस्या आहे. बाल मजुरीचे निकष ठरवण्याबाबत जगात मतैक्य नाही. देशातील एकुण लोकसंख्येपैकी ५% लोकसंख्या बालमजुरीची आहे. या वयातील फक्त १४.७% मुलांनाच शाळेत जाण्याची संधी मिळते. भारतात फक्त बालकामगारांचा भाग एकुण उत्पादनाच्या ११% आहे. गरीबी, बेकारी व अज्ञान हे बालमजुरीची मुख्य कारणे आहेत. व्यापाऱ्यांना बालमजुरांपेक्षा दूसरे सहज आणि स्वस्त धान्य नाही. त्यांना मजूरी कमी द्यावी लागते आणि काम एका वयस्क मजुराएवढे घेता येते. बालमजुरी एक सामाजिक, आर्थिक समस्या आहे. बालमजुरीचे सर्वांत वाईट रुप म्हणजे बालवेश्यावृत्ति होय. १५% वेश्या १५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या असतानाच वेश्याव्यवसायात येतात. अनेक कारखान्यात बाजमजुरीच्या कायद्या विरोधात काम होते. या उद्योगात बालमजुरीचा दुरुपयोगाचे एक प्रमुख कारण मुलांचे लहान बोटे बालमजुरीस अनुकूल असणे. कारण मुलांचे लहान बोटे त्या उद्योगांसाठी अनुकुल असतात. बालमजुरी एक सामाजिक बुराई आहे. जिचा वाईटप्रभाव लहान मुलांवर पडतो. अत्याधिक श्रम केल्यामुळे मुलांचा सर्वांगिण विकास होत नाही. परिणामतः त्यांची कार्यक्षमता कमी होते. त्यांचा बौध्दिक विकास होत नाही. शिक्षणाच्या अभावामुळे ते आयुष्यभर मजदूर बनुन जातात. बालमजुरीस रोखणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यासाठी समाजात बालमजुरी प्रतीचा मानवीय दृष्टीकोन निर्माण करुन त्यावरील समाधानकारक उपाय करावा.

**बाल गुन्हेगारी :-**

वर्तमानात मुलांवरील गुन्हे आणि मुलांकडुन होणारे गुन्हे यांचे प्रमाण वाढत आहे. मानसशास्त्रज्ञानुसार वातावरण आणि संघटित सामाजिक साधनाचे कांही विशेष कारण आहे. ज्यांचा मुलांच्या सामाजीकरणावर निश्चित आणि स्पष्ट प्रभाव पडतो. मुले आपल्या वातावरणातुनच बरेच काही घेतात. ज्याचा परिणाम त्यांना कधी विनोदी, शक्तीमान तर हिंसक बनवतो. रागावणे आणि हिंसक होवून बदला घेणे त्यांना हिरो बनल्याचे वाटते. चित्रपट, दुरदर्शन, टी.व्ही. आणि इंटरनेटचा बालमनावर अप्रत्यक्षरित्या सर्वांत अधिक प्रभाव पडतो. ज्यामुळे ते स्वतःला एका वेगळ्या जगात असल्याचे समजतात. ज्या घरात कोणीही वरिष्ठ मंडळी नसते किंवा ज्यांचे आई आणि वडील दोघेही कामाला जातात त्या घरातील मुलांबाबत असे प्रकार घडतात. मुल अपमान झाल्यामुळे हिंसक होतात. बदल्याच्या भावनेने अपहरण करुन हत्या करतात. यामुळे प्रश्न पडतो की मुले आपल्याच वयाच्या मुलांची हत्या का करतात ? याहीपेक्षा अधिक म्हणजे त्यांचा त्यांना काहीच पश्चात्ताप होत नाही. त्यांच्या परिणामाची त्यांना जाणीव नसते. बाल गुन्हेगारी इतर गुन्हेगारीप्रमाणेच असते. त्यांचे निश्चित असे एक कारण सांगता येत नाही. त्यांची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. आई-वडिलांचे अधिक नियंत्रण असणे किंवा नसणे, नैतिक शिक्षणाचा अभाव, मनोजरंनाच्या सुविधांचा अभाव, गलिच्छ वातावरण व नगर, अनुकुल वातावरणाचा अभाव इ. बाबी त्यांना गुन्हेगारी जगताकडे नेतात. यामुळे त्यांचे जीवन अधिक कष्टमय व त्रासदायक बनते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) दैनिक पुण्यनगरी-दि.१९.०३.२०१७ चा अंक
२) २१st Century World : Present Scenario & Challenges Editor-Dr.Pandit Nalawade.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded